## नियोजन (रोहयो) विभाग

**नवीन प्रशासकीय भवन, १६ वा मजला,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**(क्र.मग्रारो-२०२३/प्र.क्र.१८९/रोहयो-६अ)**

### जाहिरातीस मुदतवाढ

**"राज्य अपिलीय प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य," मुंबई** या प्राधिकरणाचे अध्यक्ष व दोन सदस्य यांची विहीत कालावधीकरीता मानधन तत्त्वावर नियुक्ती करण्यासाठी दिनांक ०६ मार्च, २०२४ रोजीच्या जाहिरातीद्वारे पात्र उमेदवारांकडून दिनांक ३१ मार्च, २०२४ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. उपरोक्त प्राधिकरणाच्या उक्त जाहिरातीनुसार पात्र उमेदवारांना अर्ज सादर करण्याकरीता **दिनांक ३१ ऑगस्ट, २०२४ पर्यंत याद्वारे मुदतवाढ देण्यात येत आहे.** त्यानुषंगाने पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात आवश्यक कागदपत्रांसह **उपसचिव (रोहयो) यांच्या नावाने उपरोक्त पत्त्यावर तसेच** egsdesk6a-mh@mah.gov.in **या ईमेलवर दिनांक ३१ ऑगस्ट, २०२४ पर्यंत** अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अर्जाचा विहीत नमुना, अटी/शर्ती व अर्हता महाराष्ट्र शासनाच्या** www.maharashtra.gov.in **या संकेतस्थळावर (मुख्यपृष्ठ-कुटुंब-रोजगार संधी) उपलब्ध करण्यात आला आहे. तसेच सदर जाहिरात mahaegs.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे.**

यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये नमूद करण्यात आलेल्या अटी/शर्ती व अर्हता कायम राहतील.

09/01/2024

स्वाक्षरी/-
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

मंत्रालयीन सेवा
महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग (रोहयो)

**नियोजन विभाग (रोहयो)**
**१६ वा मजला, नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग, मंत्रालय,**
**मुंबई - ४०० ०३२.**

**Email : egsdesk6a-mh@mah.gov.in** **दुरध्वनी क्र.०२२-२२०२८४१२**

**क्र.: मग्रारो-२०२३/प्र.क्र.१८९/रोहयो-६अ** **दिनांक : ०१ ऑगस्ट, २०२४**

प्रति,

उप सचिव,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई-३२.

**विषय : राज्य अपिलीय प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य या कार्यालयामधील पदभरती संदर्भात वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करणेबाबत.**

महोदय,

महाराष्ट्र शासनाच्या नियोजन (रोजगार हमी योजना प्रभाग) विभागाच्या अधिपत्याखालील मनरेगा योजनेंतर्गत राज्य अपिलीय प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयातील अध्यक्ष व दोन सदस्य ही पदे विहीत कालावधीसाठी मानधन तत्त्वावर भरावयाची आहेत. त्यासंदर्भातील जाहिरातीची प्रत सोबत जोडली आहे. त्यानुषंगाने सोबत जोडलेल्या जाहिरातीस व्यापक प्रसिद्धी देण्याकरीता दिनांक ०२ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या दै.लोकसत्ता, दै.लोकमत व दै.महाराष्ट्र टाईम्स या सर्वाधिक खपाच्या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करण्यात यावी, ही विनंती.

याकरीता होणारा खर्च मग्रारोहयोकरीता अनुज्ञेय असलेल्या प्रशासकीय खर्चाच्या निधीतून करण्यात येईल.

**आपला,**

**(भरतसिंग निकुंभ)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**सोबत: जाहिरातीची प्रत.**

**प्रत: माहितीस्तव**

**१.** कार्यासन –रोहयो-७, नियोजन विभाग, रोहयो प्रभाग, १६ वा माळा, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई.
**२.** निवडनस्ती- रोहयो -६अ.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग (रोहयो)


**नियोजन विभाग (रोहयो)**

**१६ वा मजला, नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**

**Email : egsdesk6a-mh@mah.gov.in** **दुरध्वनी क्र.०२२-२२०२८४१२**


**क्र.: मग्रारो-२०२३/प्र.क्र.१८९/रोहयो-६अ** **दिनांक : ०१ ऑगस्ट, २०२४**

प्रति,

संचालक,
माहिती व तंत्रज्ञान संचालनालय,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.

**विषय : राज्य अपिलीय प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य या कार्यालयामधील पदभरती संदर्भात जाहिरात प्रसिद्ध करणेबाबत.**

महोदय,

महाराष्ट्र शासनाच्या नियोजन (रोजगार हमी योजना प्रभाग) विभागाच्या अधिपत्याखालील मनरेगा योजनेंतर्गत राज्य अपिलीय प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयातील अध्यक्ष व दोन सदस्य ही पदे विहीत कालावधीसाठी मानधन तत्त्वावर भरावयाची आहेत. त्यासंदर्भातील जाहिरातीची प्रत सोबत जोडली आहे. सदर जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी, ही विनंती.

**आपला,**

**(भरतसिंग निकुंभ)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**सोबत: जाहिरातीची प्रत.**

**प्रत:** निवडनस्ती- रोहयो -६अ